२) एन.सी.टी.ई..भोपाळ/आर.सी.आय..नवी दिल्ली यांच्या नियमाप्रमाणे अभ्यासक्रमाचे विहीत दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्नता प्रदान करावी.

३) एन.सी.टी.ई..भोपाळ/आर.सी.आय..नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या अटींची पूर्तता करण्यात आल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

४ बी.एड/एम.एड/बी.पी.एड./एम.पी.एड. अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५. दि.२३.५.२०१३ च्या भाग-अ मधील क्र.१० (ब) व (क) मधील तरतुदीनुसार केलेल्या अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे अनुपालन न केल्याचे निदर्शनास आल्यास भाग-ब मधील क्र.७ नुसार कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

५) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी काही महाविद्यालयांच्या बाबतीत एनसीटीईने मंजूर केलेल्या युनिटसाठी आवश्यक पायाभुत सुविधा, शिक्षक व शिक्षकेतर वर्ग इत्यादी बाबत विहित निकषांची पुर्तता करण्याच्या अधिन राहून शिफारस केलेली आहे. विभागीय सहसंचालकांनी सदर तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींबाबत संबंधित महाविद्यालयांना अवगत करावे. अशा महाविद्यालयांच्या बाबतीत एनसीटीईच्या तपासणीदरम्यान निकषांची पुर्तता न केल्याच्या कारणास्तव सदर युनिटची मान्यता रद्द झाल्यास, अशा युनिटना दिलेले शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्दबातल समजण्यात येईल.

६) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी केलेल्या सर्व शिफारशी शासनाच्या संदर्भाधिन क्र. १ येथील दि. २१/०८/२०१५ रोजीच्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, 2014 च्या अनुषंगाने निकषांची काटेकोर तपासणी करुन केलेल्या आहेत, या धारणेच्या अधीन राहून सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. भविष्यात या संदर्भात उद्भवणारी न्यायालयीन प्रकरण अथवा अन्य आक्षेपांची संपूर्ण जबाबदारी संबंधित सहसंचालकांची राहील.

(रोहिणी भालेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
सर्व संबंधित कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र/शारिरीक शिक्षण महाविद्यालय (संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्फत)
निवडनस्ती (मांश-२)